


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र । रविवार दि. ०३ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४४ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







# राज्यात बारावीचा निकाल जाहीर

## पुन्हा मुलींनी मारली बाजी; ९४ टक्के निकालासह कोकण विभाग अव्वल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात १२ वी निकाल जाहीर झाला असून यात ९४.१४ टक्क्यांसह कोकण विभाग अव्वल ठरला आहे. यंदाच्या निकालात पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारल्याचे चित्र आहे. बारावीचा एकूण निकाल ८९.७९ टक्के लागला असून त्यात ९३.१५ टक्के मुली तर ८६.८० टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत. बारावीच्या निकालात लातूर विभाग सर्वात मागे राहिला आहे. लातूरमध्ये ८४.१४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.


मुलींची पुन्हा बाजी, 'कोकण' पॅटर्न ठरला नंबर १!

यंदाच्या निकालात एकूण १५३ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. मागील ३-४ वर्षातील आकडेवारी पाहिली तर २०२३ मध्ये विज्ञान शाखेत ९०.९६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले, २०२४ साली ९७.८२ टक्के, २०२५ साली ९७.३५ टक्के तर यंदा २०२६ मध्ये ९६.४४ टक्के विज्ञान शाखेचे विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्याचसोबतच ९८.०२ टक्के कला शाखेचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ८७.०३ टक्के वाणिज्य शाखेचे विद्यार्थी यंदाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. व्यवसाय अभ्यासक्रमासाठी ८२.७४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. आयटीआयसाठी ८१.७८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. मागील वेळच्या तुलनेत यंदा २.०९ टक्के निकालात घसरण झाली आहे.

### ● गुणपडताळणी आणि पुनर्मूल्यांकन सुविधा

निकालानंतर गुणपडताळणीसाठी विद्यार्थ्यांना रविवार, ३ मे ते १७ मे २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. यासाठी प्रति विषय ५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी याच कालावधीत अर्ज करता येईल आणि त्यासाठी प्रति विषय ४०० रुपये शुल्क असेल. पुनर्मूल्यांकनासाठी प्रथम छायाप्रत घेणे अनिवार्य असून त्यानंतर प्रति विषय ३०० रुपये शुल्कासह ऑनलाईन अर्ज करता येईल. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारण्यासाठी पुढील तीन परीक्षांची संधी देण्यात आली आहे.




# महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

## विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर बीड जिल्हा घडविण्याचा संकल्प करुया: उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार





**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्याची भूमी ही संतांची, महंतांची, शूरांची, वीरांची, बुद्धीवंतांची आणि कर्तृत्ववान सुपुत्रांची भूमी आहे. या भूमीला धैर्याचा, शौर्याचा, संघर्षाचा वारसा आहे. संत गोरोबाकाकांच्या पवित्र तेर नगरीत माझा जन्म झाल्यामुळे माझे या भूमीशी एक अतूट नातं आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

### आठ वर्षांपूर्वी अंबाजोगाईतून हरवलेला तरुण दिल्लीत सापडला

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर पोलिसांच्या कौशल्यामुळे अखेर बाप-लेकाची झाली गळाभेट शिक्षणाच्या ओझ्याखाली दबलेला आणि अपयशाच्या भीतीपोटी आपल्या जन्मदात्यांपासून दुरावलेल्या एका तरुणाचा तब्बल आठ वर्षांनंतर आपल्या वडिलांशी पुनर्भेट झाली आहे. लातूर जिल्ह्यातील रहिवासी असलेला हा तरुण ९ मार्च २०१८ रोजी अंबाजोगाई येथून बेपत्ता झाला होता, ज्याचा शोध बीड पोलिसांनी तांत्रिक कौशल्याच्या जोरावर दिल्ली-गाझियाबाद परिसरातून लावला आहे. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी २०२६ मध्ये राबवलेल्या विशेष शोध मोहिमेला ▶▶ उर्वरित पान २ वर

### ना. पंकजाताई मुंडे यांचा परळीत प्रभावी 'जनता दरबार'

## परळी, बीडसह जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्यांचा जागेवर निपटारा

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळीसह बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करता यावे, त्यांचे जीवन कष्टमुक्त व्हावे या उदात्त हेतूने ना. पंकजाताई मुंडे या त्यांच्या प्रत्येक दौऱ्यात 'जनता दरबाराचे' आयोजन करतात. नेहमी प्रमाणे आजही त्यांचा ▶▶ उर्वरित पान २ वर



## शाळेत कागदपत्रांमध्ये आता आईचेही नाव लागणार, मातेच्या नावाने मुलाची ओळख

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या सर्व शाळांमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात विद्याथ्यारच्या नावात आता आईचं देखील नाव असणं आवश्यक असणार आहे. याआधी विद्यार्थ्यांचं नाव, नंतर वडिलांचं नाव आणि मग आडनाव अशा प्रकारची पद्धत होती. पण आता विद्यार्थ्यांच्या नावानंतर आईचं नाव, नंतर वडिलांचं नाव आणि त्यानंतर आडनाव अशा पद्धतीने विद्याथ्यारच्या नावाची नोंद होईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय शासकीय, अनुदानित आणि खासगी अशा सर्व शाळांसाठी लागू होणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून तात्काळ प्रभावाने हा निर्णय लागू करण्यात येणार आहे.

# किसान बाबा व नवनाथ बाबा यांच्या प्रमाणे हृदयात हरी साठवावा : कृष्णा महाराज राऊत

### गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमे निम्मित कीर्तन व महाप्रसाद

**बीड । प्रतिनिधी**

सद्गुरु किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांनी आपल्या हृदयामध्ये भगवंत साठविला आहे त्या प्रमाणे भगवंत हृदयात साठवावा असे अभंग विवेचनात ह भ प कृष्णा महाराज राऊत यांनी केले . श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. १ मे शुक्रवारी दुपारी बुद्ध पौर्णिमे निम्मित गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ह भ प कृष्णा महाराज राऊत यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. कीर्तनात ह भ प कृष्णा महाराज यांनी संत तुकाराम महाराज यांचा



सांठविला हरी ।
जींहीं हृदयमंदिरीं ।।१।।
त्यांची सरली येरझार ।
जाला सफळ व्यापार ।।ध्रु.।।
हरी आला हाता ।
मग कैंची भय चिंता ।।२।।
तुका म्हणे हरी ।
कांहीं उरों नेदी उरी ।।३।।

हा अभंग विवेचनात घेतला अभंग विवेचनात करताना महाराज म्हणाले की माणसाने आपल्या हृदयामध्ये हरी/ भगवंत साठवा जसा गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज व सद्गुरू किसान बाबा ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीडमध्ये शाहीलग्नात फटाक्यांचा भीषण स्फोट

## दोन फोटोग्राफर गंभीर जखमी, कॅमेरे जळून खाक




**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बार्शी रोडवरील एका मंगल कार्यालयात मंगळवारी (दि. २८) सायंकाळच्या सुमारास शाही विवाह सोहळा सुरू असताना फटाक्यांच्या स्फोटाने मोठी दुर्घटना घडली. विवाह विधी पार पडल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी केली जात असताना, दारूगोळा असलेला एक मोठा फटाका आकाशात जाण्याऐवजी जमिनीवरच फुटला. या प्रचंड स्फोटात फोटोशूट करणारे दोन तरुण फोटोग्राफर गंभीररीत्या भाजले असून, त्यांचे कॅमेरेही जळून खाक झाले. या भीषण अपघातात एका फोटोग्राफरचा चेहरा प्रचंड भाजला असून, त्याच्या एका डोळ्याला गंभीर जखम झाली आहे तर दुसऱ्या फोटोग्राफरच्या कानाचा पडदा फाटला आहे. यासोबतच त्यांचे दोन महागडे कॅमेरेही पूर्णपणे खराब झाले आहेत. जखमींना तातडीने बीड येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे, जखमींपैकी एका फोटोग्राफरचा विवाह १ मे रोजी होणार आहे. ऐन लग्नाच्या तोंडावर ही दुर्घटना घडली. सद्य:स्थितीत त्याच्यावर उपचार सुरू असून, त्याला केवळ लग्नाच्या विधीपुरतेच विवाहस्थळी आणले जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.



# वारकरी संप्रदायातील नाठाळ घुसखोरी

ज्ञानदेवे रचिला पाया।
तुका झालासे कळस

या सहा शब्दात संत नामदेव ते संत तुकाराम अशी ४०० वर्षांची वारकरी संतांची थोर परंपरा आहे. या संतांनी धर्म- वर्ण -जातिभेदातून निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेचा धिक्कार केला आणि समतेचा आग्रह धरीत वारकरी संप्रदायाचा वाढ-विस्तार केला. ह्या वाढ-विस्तार कार्यात १०० हिंदू संत आहेत, तर ४१ मुस्लीम संत आहेत. हे सगळे संत कर्मकांड नाकारणारे विद्रोही विचाराचे आहेत. ज्ञानेश्वरी हा अमृतानुभव देणारा ग्रंथ आहे. त्यात संत ज्ञानेश्वर हे श्रीकृष्ण मुखातून अर्जुनाला उपदेश करताना म्हणतात -

या परी पाप योनी अर्जुना।
का वैश शूद्र अंगना।।
माते भजना सदना।
माझीया येती।।

ही ओवी सर्व प्रकारची वर्ण्यव्यवस्था ; म्हणजे मनुस्मृती नाकारणारी आहे. 'हरिपाठ' मध्येही संत ज्ञानेश्वर ठणकावून सांगतात-

योग-याग विधी, येणे नोहे सिद्धी।
वायाचि उपाधी, दंभ धर्म।।

अर्थात, कर्मकडांतून कोठलीही सिध्दी प्राप्त होत नाही ; सबब, सिद्धपुरुष वा त्यासारख्या उपाध्या खोट्या आहेत. भेदाभेद भ्रम अमंगल असा उपदेश करणारे संत तुकाराम हेदेखील सर्वाभूती पाहे, एक वासुदेव असं म्हणतात. या समतावादी विचार आग्रहामुळेच वारकरी संप्रदायाबरोबरच संत तुकोबारायांपासून सुरू झालेली पंढरीची वारी देखील गेली ४०० वर्ष टिकून आहे.

तथापि, या समतेच्या प्रवाहाची गटारगंगा करण्याचं काम सत्तास्वार्थी राजकारणासाठी गेली ४० वर्षे सुरू आहे. १९८६ मध्ये संघ-भाजप परिवारच्या विश्व हिंदू परिषदने पुढाकार घेऊन, हभप धुंडा महाराज देगलूरकर अध्यक्षतेखाली आळंदीत पहिलं वारकरी संमेलन आयोजित केलं. तेव्हापासून वारकरी हे आधी हिंदू आहेत अशी भूमिका घेत वारकरी संप्रदायाच्या समतावादाची नासाडी सुरू झाली. ह्या सैराटी नासाडीला शरद पवारांनी २०२३मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात वारकरी संप्रदायातील घुसखोरी म्हटले. ह्या लेखाचे अलिकडे पुनर्मुद्रण झाल्यावर तो वादाचा विषय झाला. सोशल मिडियातून कथित हिंदुत्ववाद्यांनी पवारांच्या विरोधात टीकेची झोड उघडली. त्याला प्रत्युत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदायात घुसखोरी केलेल्या २० बुवा महाराजांची यादी प्रसिद्ध केली. त्याने वादाच्या आगीत तेल ओतले गेले. प्रकरण लवांडे यांना फोन वरून हत्येच्या धमक्या देण्यापर्यंत गेले. कारण, लवांडे यांनी ह्या घुसखोरीवर वर्मी घाव घातलाय. त्यांनी वारकरी संप्रदायात घुसलेल्या बुवालोकांची धर्मांधता आणि कीर्तन- प्रवचनांमधील राजकीय प्रचारकी ह्याचे व्हिडिओ सोशल मिडियातून जाहीर करण्याचा सपाटा सुरू केलाय. तथापि, ह्या घुसखोरीच्या पोस्टमार्टमला खूप उशीर झाला आहे. दरम्यानच्या काळात सत्तेच्या पाठिंब्यावर भिडे गुरुजीने तलवारधारी धारकऱ्यांसह पंढरीच्या वारीची अडवणूक केली. त्यानेच मनूचे श्रेष्ठत्व सांगताना ज्ञानोबा- तुकोबांचा अवमान केला. पावशेर भिडे गुरुजीपुढे बेताल बोलण्यात सव्वाशेर असणाऱ्या हभप निवृत्ती महाराज वक्ते यांना फडणवीस सरकारने पाच लाख रुपयांचा ज्ञानोबा-तुकोबा पुरस्कार (२०१७) देऊन विकास लवांडे यांच्या यादीतील वारकरी संप्रदायातील घुसखोरांची हिंमत वाढवली.

ह्या घुसखोरांचा मेरुमणी ठरावे, असे वक्तेबुवा होते. पुरस्कारासाठी आवश्यक असणारी ज्ञानोबांची लीनता आणि तुकोबांची क्षमाशीलता त्यांच्या ठायी नव्हती. ( पुरस्काराच्या वेळी वक्तेबुवा ८३ वर्षांचे होते. कोरोना काळात- २१ डिसेंबर २०२० रोजी त्यांचं निधन झालं.) ते बुलढाणा जिल्ह्यातल्या वाडळी गावातील (तालुका खामगाव) वतनदार पाटील घराण्यातले. वडील- आजोबांच्या संस्कारामुळे त्यांना लहानपणापासून भागवत धर्माची ओढ लागली. शिक्षण इयत्ता दुसरीपर्यंतच झालं. त्यांना पुढे शिकायचं होतं. पण घराची परिस्थिती पालटल्याने त्यांच्यावर शाळा सोडून गायी-गुरं वळायची वेळ आली. पण गायींना चरवता- चरवता त्यांनी वयाच्या १८ व्या वर्षांपर्यंत सकल संत गाथातील अडीच हजार अभंग मुखोद्गत केले. १७व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. १८ व्या वर्षी वारकरी साहित्याच्या अध्ययनासाठी ते आळंदीला गेले. तिथे साधकाश्रमाची चार वर्ष पूर्ण करून पंढरपुरात आले. तिथे त्यांनी गोपाळशास्त्री गोरे, धारूरकरशास्त्री अशा २४ विद्वानांकडून अध्यात्म आणि तत्त्वज्ञान या विषयातील न्याय, पूर्व मीमांसा, तर्कशास्त्र आदिचे पाठ घेतले. वक्तेबुवांची पाठांतराची आणि ज्ञान आकलनाची क्षमता अवर्णनीय अशीच होती. या बळावर ते वयाची ऐंशी उलटली तरी, अडीच-तीन तासाचं कीर्तन सहज करू शकत. पण कीर्तन करताना बोलत- वागत कसे ? एक संस्कृत सुभाषित आहे-

यथा चित्तं तथा वाचो।
यथा वाचस्तथा क्रिया:।।
चित्ते वाचि क्रियायां च ।
साधूनामेकरूपता।।

अर्थात, जसं मन तशी वाणी, जशी वाणी तशी कृती! अशाप्रकारे मन, वाणी व कृती यांचा मेळ असणे, हे साधूपुरुषांचं लक्षण होय ! असा मेळ विद्वान असूनही वक्तेबुवांमध्ये नव्हता. त्यामुळे ते कीर्तन-प्रवचन भजनात प्रासादिकता पूर्णपणे आवश्यक असताना, त्यात ते राजकारणाचा अनावश्यक रंग मिसळत. पंडित नेहरूआणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख 'एकेरी'ने करीत. नेहरूने देश बुडवला, आंबेडकरने संपूर्ण घटनाच हिंदूविरोधी केली असं बोलत. (पुराव्यासाठी त्यांच्या नावे असलेलं संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन हे पुस्तक पहा.) अंधश्रद्धाविरोधी कायद्यासाठी झटणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि श्याम मानव यांना ते देवेंद्र फडणवीस व एकनाथ खडसे यांच्या समोर 'गुंड' म्हणाले होते. भोसडीचे पुरोगामी अशी ते गरळ ओकत. 'विद्रोही तुकाराम' ग्रंथलेखन केलेल्या आ. ह. साळुंखे यांची 'ख्रिश्चन पत्नी केलेला' अशी खोटी ओळख सांगितली आहे. (पुस्तक: हिंदू जागृती) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि त्यांचंच समाज प्रबोधनाचं कार्य आज पुढे सत्यपाल महाराज यांना त्यांनी 'हिंदूविरोधी' ठरवलं होतं. पांडुरंगशास्त्री आठवले आणि वामनराव पै यांच्या सत्संगाचीही त्यांनी टिंगल उडवली होती. शास्त्रीजींचा उल्लेख ते पांड्या असा करीत. 'प्रजापती ब्रह्मकुमारी' भगिनींचा आळंदीत कार्यक्रम होता. त्यांच्या विरोधात त्यांनी अपशब्द वापरलेच ; पण त्यांनी कार्यक्रमासाठी मांडलेल्या खुर्च्या वारकऱ्यांना इंद्रायणी नदीत फेकायला लावल्या. वारकरी संप्रदायचा समतेचा आग्रह धरणाऱ्या, अंधश्रद्धा निमूर्लन कायद्याला पाठिंबा देणाऱ्या बुवा-महाराजांची कीर्तनं त्यांनी दादागिरीची भाषा करून संयोजकांना रद्द करायला लावली होती. महिला कीर्तनकारांनाही त्यांनी विरोध केला होता.

गोरे आणि धारूरकरशास्त्रींची ही कर्मठता वक्तेबुवांना कधी हिंदूविरोधी वाटली नाही. किंबहुना, त्याचाच त्यांनी प्रसार केला. त्यामुळेच, मे २००५ रोजी गोपाळ बडवे हा बडवा मंदिराच्या तीर्थकुंडात लघवी करताना सुरक्षारक्षकांनी पकडला ; तेव्हा तो वेडा आहे, असं अमृत वक्त्तेबुवांच्या मुखातून बाहेर आलं. वक्तेबुवांच्या या साऱ्या नालायकीचा वापर जयंत आठवले यांच्या सनातन संस्थाने मोहीम हिंदू जागृतीसाठी केला. त्यासाठी रामेश्वरशास्त्री महाराज, बाबूराव महाराज वाघ, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, वा.ना. उत्पात, मारुती महाराज तुणतुणे ही बुवामंडळी गॅंगसारखी वापरली. या गँगचे वक्तेबुवा डॉन होते . या साऱ्यांच्या कर्तृत्वाचा लाभ संघ-भाजपला आपलं राजकारण रेटण्यासाठी आणि सत्ताधारी होण्यासाठी झाला. त्याचा परतावा म्हणून वक्तेबुवांना पुरस्कार 'राजमान्यता' देणे क्रमप्राप्तच होते. अर्थात, त्याने फडणवीस सरकारची आणि वक्तेबुवांची किंमत वाढली, असे झाले नाही. कारण, तुकाराम महाराज म्हणतात, तसे-

कावळ्याच्या गळा, मुक्ताफळं माळा।
तरी काय त्याला, भूषण शोभे।।

हे खरे असले, तरी काळ सोकावतो ना! वारकरी संप्रदायाशी ह्या विसंगतीविरोधात वेळीच आवाज उठवला असता, तर आज संप्रदायात घुसलेल्या मनुवादी घुसखोरांची यादी जाहीर करण्याची वेळ आलीच नसती. वारकरी सप्रदायातील हे मनुवादी घुसखोर म्हणजे, वक्तेबुवा आणि गँगच्या सुधारित आवृत्या आहेत.

मुंगळा पायाशी असतो, तेव्हाच ठेचावा. एकदा तो कपड्यात शिरला की, वस्त्रहरण अटळ ठरते! त्याचा कटू अनुभव अस्सल वारकरी आणि हभप बुवा महाराज घेत आहेत.

बोला, रामकृष्ण हरी विठ्ठल!!

गाथा मंदिरात अवतारी घुसखोरी

वारकरी संप्रदायातील मनुवादी घुसखोरीची मूर्तिमंत साक्ष म्हणजे, देहू (जिल्हा : पुणे) येथील संत तुकाराम गाथा मंदिर! मूळ मंदिरापासून ते अर्धा किलोमीटर दूर आहे. दोन एकरांच्या विशाल प्रागंणात ३५ हजार स्वेअर फुटांचं हे तीन मजली भव्य मंदिर आहे. ९ शिखरं आणि ३३ कळस असलेल्या या मंदिरात संत तुकारामांची भव्य मूर्ती आहे. मात्र, या मंदिराचे वेगळे रूपडे हे तेथील भिंतींत संगमरवरी दगडावर कोरून बसवलेल्या अभंगांमध्ये आहे. तुकोबांच्या गाथेमध्ये ४,१४५ अभंग आहेत. ते इथल्या तीन मजल्यांच्या भिंतींवर संगमरवरी दगडात कोरलेत. श्री संत तुकाराम महाराज वाङ्मय संशोधन मंडळ-देहू या ट्रस्टच्या वतीने या 'गाथा मंदिरा'ची उभारणी झालीय. या निर्माणासाठी तेव्हा ट्रस्टचे अध्यक्ष असलेल्या जुन्नरच्या 'हभप' पांडुरंग आबाजी घुले महाराजांनी खूप मेहनत घेतलीय. त्यांनी करोडो रुपयांच्या देणग्या जमवून हे मंदिर बांधलंय. त्यात भव्यता आहे. परंतु, तुकोबांचे दिव्य दर्शन घडवण्याच्या अट्टहासापोटी, तुकोबांच्या विचारांचा भक्कमपणा भुसभुशीत करण्यासाठी मनी (पैसा) बळाने अवतारी मनुवादाची घुसखोरी झालीय.

आम्ही वैकुंठवासी। आलो याच कारणासी- या तुकोबांच्या अभंगातील एका ओळीवर त्यांची जीवनगाथा वैकुंठ गमनाच्या सोहळ्याने संपवण्यात आली. त्यासाठी विमान आल्याची कथा रचण्यात आली. ते विमान कुणी पाठवले ? ते कुठे गेले ? त्यात इंधन काय होते ? त्यानंतर ते विमान पुन्हा कधीच का नाही आले ? असे प्रश्न लोकांना आताच सुचतात, असं नाही. तरीही, ह्या 'गाथा मंदिर'मध्ये त्याची पुढची पायरी गाठलीय. ती तुकोबांचा विचार मारणारी आहे. या मंदिरात तुकोबांच्या भव्य मूर्तीच्या वर आठ स्तंभांवर उभारलेला उंच घुमट आहे. हे स्तंभ २५ फुटाच्या भिंतीने जोडल्यामुळे अष्टकोन तयार झालाय. या आठ भिंतींवर तुकोबा चार युगात कोणकोणत्या अवतारात होते आणि त्यांचे तेव्हा आराध्यदैवत कोण होते, ते सांगणारी पौराणिक (म्हणजे काल्पनिक) चित्रं आहेत.

तुकोबा देह हेच देवाचे मंदिर असल्याचं सांगताना, का हो जाता, देवळात असा प्रश्नही विचारतात. देव नाही ऐसे, समजावे मनी। देव आहे ऐसे सांगावे जनी।। अशी वाद टाळण्याची सोपी युक्ती सांगत देव नाकारतात. ते 'अवतार', 'पुनर्जन्म' आणि युगाचे थोतांड कसे मानणार ? या 'गाथा मंदिरा'तील एका अभंगातून तुकाराम महाराज बोलतात-

येथे नाही उरे । आले अवतार।।
येर (इतर) ते पामर। जीव किती ।।

तुकोबांचा समाज प्रबोधनाचा हक्क नाकारत सनातनी कर्मठ ब्राह्मणांनी ज्या इंद्रायणीत त्यांचे अभंग बुडवले ; त्याच इंद्रायणीकाठी गाथा मंदिर उभं राहातं, हा काळाने उगवलेला सूड आहे. या ऐतिहासिक बदलास ४०० वर्षं जावी लागणं आणि तरीही त्याच्या भव्यतेला पोखरणारे अवतारी उंदीर लागणं, ही तुकोबांना मानणार्यांसाठी अभिमानास्पद बाब नाही.

या गाथा मंदिरच्या प्रांगणात समर्थ रामदास साधक स्वामी निवास ही इमारत उभी राहिलीय. त्यात साधकांना प्रशिक्षण देणारे संत श्री तुकोबाराय गुरुकुल आहे. हे म्हणजे, पाहुण्याने यजमानाला भाडेकरू ठेवल्यासारखे झाले. रामदास स्वामींच्या नावाला विरोध असण्याचं कारण नाही. तथापि, रामदास स्वामींच्या जन्मगावी- (सातारा-कराड मार्गावरील) चाफळ येथे तुकाराम महाराजांच्या नावाने काही दिसत नाही. तिथे सोवळं सांभाळायचं आणि देहूत घुसखोरीचं ओवळं झटकायचं, ही हरामदासी झाली. ती वहिवाटीची करण्यासाठी दासबोधला परिपूर्ण ग्रंथ ठरवताना ज्ञानेश्वरी आणि गाथाला दुय्यम ठरवणाऱ्या स्वामी गोविंददेव गिरी महाराजानी ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस, ह्या तुकोबा शिष्या बहिणाबाई यांच्या अभंगाला - ध्वज होई रामदास हे शेपूट जोडलंय. ही हरामदासी वारकरी संप्रदायातली मनुवादी घुसखोरी पक्की आणि प्रतिष्ठित करण्यासाठी आहे!

**- ज्ञानेश महाराव (ज्येष्ठ पत्रकार- संपादक)**

◆ पान ९ वरून पुढे...

## महाराष्ट्र दिन...

मराठवाड्याची लेक म्हणून या मातीतल्या संस्कारांचा आणि वारशाचा मला अत्यंत अभिमान आहे. आपण सर्वजण एकत्र येऊन विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर बीड जिल्हा घडवण्याचा संकल्प करूया, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

बीड येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा आज श्रीमती पवार यांच्या हस्ते येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. युवकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण आणि कौशल्य मिळावे यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या सहकार्याने 'एमआयडीसी'त सुमारे १९७ कोटी रुपयांचा 'सी-ट्रिपल आयटी' प्रकल्प उभारण्यात येत आहे. याचे काम प्रगतीपथावर असून जिल्ह्यातल्या सात हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. उदयोन्मुख खेळाडूंसाठी क्रीडा संकुलातल्या सुविधांचा विकास करत २५ कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. येत्या जुलै २०२६ मध्ये 'स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा' सुध्दा होणार असून, यामुळे राज्यातील खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आणि पुढील पातळीवर झेप घेण्यासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. 'बीड-अहिल्यानगर-परळी वैजनाथ' रेल्वे मार्गाच्या उर्वरित कामांसाठी सुध्दा निधी मंजूर करण्यात आला असून हा महत्त्वाचा दळणवळण प्रकल्प लवकरच पूर्णत्वास नेण्याचा आपला संकल्प आहे. 'एमआरआय' सुविधा, माता-बाल संगोपन सेवा आणि इतर आधुनिक आरोग्य सुविधा यामुळे बीड जिल्हा आरोग्यदृष्ट्या अधिक सक्षम होत आहे. 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेत बीड जिल्ह्याने अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यात घरकुले पूर्ण करण्यामध्ये बीड जिल्ह्याने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी नियोजन विभागाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन २०२६-२७ अंतर्गत जिल्ह्याकरिता ६२३ कोटींचा आराखडा मंजूर केला आहे. आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास या क्षेत्रांसाठी जिल्हा नियोजन योजनेत मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे दि. १ मे ते दि. १५ मे २०२६ या कालावधीत वेबपोर्टवर जाऊन 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रत्येक कुटुंबाने संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती नोंदवावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. 'शिव-शाहू-फुले-आंबेडकरां'च्या विचारांवरच राज्य सरकारचे काम सुरु आहे, यापुढे सुध्दा ते सुरु राहील, हा शब्द या निमित्ताने राज्यातल्या जनतेला यावेळी त्यांनी दिला. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण या सर्व क्षेत्रांत समतोल आणि शाश्वत विकास साधत बीड जिल्ह्याला महाराष्ट्रातील अग्रगण्य जिल्हा बनवूया. त्यासाठी आपण सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले

## ना. पंकजाताई मुंडे....

भव्य जनता दरबार संपन्न झाला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देऊन नागरिकांचे प्रश्न सोडविले.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शासकीय विश्रामगृहात ना. पंकजाताई मुंडे यांचा जनता दरबार पार पडला. यात बीड जिल्ह्यातील आणि परळी तालुक्यातील असंख्य नागरिकांनी त्यांच्या समस्या व गाऱ्हाणी मांडल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी तत्परतेने प्रत्येक विषयात लक्ष देऊन संबंधित शासकीय, निमशासकीय विभागांना बोलून नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

अलोट गर्दीत प्रभावी जनता दरबार- ना. पंकजाताई मुंडे यांचा जनता दरबार म्हणजे समस्या मार्गी लागण्याची हमी असते. प्रशासकीय कामांसह नागरिकांचे व्यक्तिगत सुख, दु:खाचे विषय देखील पंकजाताईंच्या माध्यमातून मार्गी लागतात. शासकीय विश्रामगृहाच्या भरगच्च सभागृहातील अलोट गर्दी याची साक्ष देत होती. प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेत तात्काळ संबंधिताना संपर्क करून कामे मार्गी लावण्याच्या सूचना देऊन जागेवर त्यांनी समस्यांचा निपटारा केला. त्यांचा हा प्रभावी जनता दरबार सर्वसामान्यांचे जीवन कष्टमुक्त करण्याची अभिनव संकल्पना असल्याची भावना यावेळी नागरिक व्यक्त करत होते.

## किसान बाबा व....

महाराज यांनी आपल्या हृदयामध्ये भगवंत साठविला आहे जो मनुष्य आपल्या हृदयामध्ये हरी साठवतो त्याला पुन्हा जन्म मृत्यू च्या चक्रा मध्ये हेलफाटे घालावे लागत नाहीत.साक्षात किसान बाबा व नवनाथ बाबा यांच्या प्रमाणे भगवंत हाताशी राबतो म्हणून म्हणून भक्त जणांनी आपल्या हृदयामध्ये हरी साठवावा ज्याच्या हृदयामध्ये हरी साठवलेला आहे त्याच्या हाताखाली साक्षात भगवंत राबवतो जसं भगवंत संत शांती ब्रह्म एकनाथ महाराजांच्या हाताखाली राबत होता तसं आजही गुरुवर्य किसन बाबा यांच्या हाताखाली साक्षात भगवंत राबतो आहे म्हणून भक्ती अशी करावी की भगवंत हाताखाली राबला पाहिजे इतका अधिकार निर्माण करावा असे अभंग विवेचन करताना ह भ प कृष्ण महाराज यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.संत एकनाथ महाराजांच्या नंतर शांती ब्रह्म ही उपाधी फक्त दोन माणसाला शोभून दिसते एक कुरेकर बाबा व दुसरे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज असे भावना उद्गार कृष्ण महाराजांनी व्यक्त केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील जे वैभव आहे यामागे गुरुवर्य साधू बाबा महाराज किसन बाबा महाराज व शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे खूप कष्ट त्याग व तपश्चर्य आहे म्हणूनच गोरक्षनाथ टेकडीचे वैभव दिसत आहे असे कृष्ण महाराज म्हणाले यावेळी टाळकरी माळकरी भजनी मंडळी मृदुंग वादक विणेकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते दर पौर्णिमेप्रमाणे या महिन्याच्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त जुजगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## आठ दिवसांत....

सातत्याने पाठपुरावा केला होता. आज अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने साधलेला हा योग ग्रामस्थांसाठी दिलासादायक ठरला. महंत शिवाजी महाराजांनी व्यक्त केलेली खंत लक्षात घेऊन आ. संदीप क्षीरसागर यांनी तत्परतेने निर्णय घेत नागझरी-मानेचावाडा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आभार व्यक्त केले. या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ग्रामीण भागातील....

शेती क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. मात्र कृषीप्रधान देश असलेला भारत या बाबतीत काही प्रमाणात मागे राहिला आहे. अशा परिस्थितीत महेश बेदरे यांनी ग्रामीण शेतकऱ्यांसाठी उभारलेले हे कृषी प्रदर्शन आणि कृषिरथ हे शेती क्षेत्राला नवी दिशा देणारे असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेवराई तालुक्यात गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या शेतीत सकारात्मक बदल घडून आले आहेत, आता बीडमध्येही हे प्रदर्शन यांनी आयोजित केल्यामुळे नक्कीच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांनाही नवी दिशा मिळेल असे सांगून ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असून या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळून त्यांचे उत्पादन व उत्पन्न निश्चितच वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या भव्य व शिस्तबद्ध कृषी प्रदर्शनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी कृषिभूषण महेश बेदरे यांचे तोंडभरून कौतुक केले. या कृषी प्रदर्शनाच्या पहिल्या वर्षापासून आजपर्यंतचे १८ वर्षांचे यशस्वी प्रवासाचे आपण साक्षीदार आहोत. या प्रदर्शनामुळे गेवराई तालुक्यासह आता बीड परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असून येणाऱ्या काळातही शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन दिशादर्शक ठरेल, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश बेदरे यांनी केले, प्राध्यापक जगता यांनी केले तर रकटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मराठा साम्राज्याचा....

आला. तसेच राजस्थानातील विजयाची ऐतिहासिक वस्तुस्थिती नाकारणे चुकीचे असून कोणत्याही दबावाखाली इतिहासात बदल करू नये, अशी ठाम भूमिका व्यक्त करण्यात आली. निवेदन लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी निवेदन स्वीकारले. या संदर्भात जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात, सुनिल ढवळे, दादा गायकवाड, सुरेश ढवळे,सर्पमित्र अशोक जाधव, संजय पावले,भगवान मोरे, रमेश वाणी, अंकुश वाणी, सुरेश कुलकर्णी,कचरू निर्मळ अनेक नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## भोगलगाव कार्नर....

प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता वर्तवल्या जात आसतांनाच दोन्ही बाजुने ड्रेन न खांदल्यास रस्ता बनकुन उपयोग तरी काय ? ड्रेनच नसेल तर पाणी रस्त्यावरच पसरून रस्ता लागलीच खराब होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता आसल्याने संबंधित अभियंता व गुत्तेदाराने तत्पुरविच भोगलगाव कार्नर ते गंगावाडी कार्नर रस्त्याच्या दोन्ही बाजुने आधी ड्रेन काढावे आशी मागणी होऊ लागली आहे. या आधी संबंधित अभियंता व गेवराई तहसीलला या बाबत अर्ज देखील देण्यात आल्याची चर्चा आहे.

## देवीनिमगाव येथे....

असणार आहे. या भव्य सोहळ्याची सुरुवात मंगळवारी सकाळी १० वाजता निळध्वजारोहणाने होणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.मिरवणुकीची सांगता झाल्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता सर्व उपस्थित नागरिकांसाठी आणि समाज बांधवांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.या संयुक्त जयंती उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे रात्री ८ वाजता आयोजित करण्यात आलेला प्रबोधनात्मक कार्यक्रम.प्रसिद्ध टीव्ही स्टार शीतल साठे आणि सचिन माळी यांचा 'शाहिरी जलसा' यावेळी संपन्न होणार आहे. या माध्यमातून शाहिरी परंपरेतून महापुरुषांचे विचार आणि कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविले जाणार आहेत.या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बहुजनांचे नेते माजी आ.भीमराव धोंडे हे भूषविणार आहेत.प्रमुख पाव्हुणे म्हणून पप्पु कागदे,आ. सुरेश धस,माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. बाळासाहेब आजबे, सतीश शिंदे,विजय गोल्हार, सरपंच संदीप मार्कंडे, साहेबराव मस्के, रमेश गावडे,सरपंच गायकवाड,दत्तू पवणे, माजी सरपंच बिट्टू पोपळे,मुरली अण्णा पाचे, बंकटसिंग परदेशी आदि मान्यवर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास लाभणार आहे. या संयुक्त जयंती महोत्सवाचे अत्यंत नेटके संयोजन रिपाइंचे नेते अशोकभाऊ साळवे यांनी केले आहे. देवीनिमगाव येथील ग्रामस्थांनी या उत्सवासाठी मोठा सहभाग दर्शविला आहे. परिसरातील सर्व नागरिकांनी, माता-भगिनींनी व तरुणांनी या सर्व कार्यक्रमांना सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहून महापुरुषांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्रोध व अहंकार....

सांगितले की, प्रत्येकाने आपले जीवन आनंदी, शांत व निरामय बनवायचे असेल तर मनातील काम, क्रोध, अहंकार व द्वेष या विकारांचा त्याग करणे अत्यंत आवश्यक आहे. मन शुद्ध, निर्मळ व सकारात्मक ठेवून भगवंताची निष्ठेने सेवा केल्यास त्याची कृपा आणि आशीर्वाद नक्कीच प्राप्त होतात, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांगरे वस्ती येथे सुरू असलेल्या या धार्मिक कार्यक्रमात पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून हरिनामाच्या गजरात व शिवभक्तीच्या वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. कालच्या कथाप्रसंगी महाराजांनी प्रजापती दक्ष राजा व भगवान शिव,सती माता यांच्या विवाह सोहळ्याचे अत्यंत रसाळ व प्रभावी वर्णन केले. तसेच दक्ष राजाच्या यज्ञात निर्माण झालेली विघ्ने आणि ती कशी दूर झाली याचे सविस्तर विवेचन केले. यावेळी महाराजांनी जीवनातील काही महत्त्वपूर्ण तत्त्वे सांगितली. ज्या ठिकाणी आपल्याला मान-सन्मान मिळत नाही किंवा जिथे आपल्याला निमंत्रण नसते, अशा ठिकाणी जाणे टाळावे. मात्र भजन-कीर्तन, हरिनाम सप्ताह यांसारख्या धार्मिक व सत्संग कार्यक्रमांसाठी निमंत्रणाची वाट न पाहता सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### तलवाडा येथील माजी पंचायत समिति सदस्य बाबासाहेब आठवले यांचा अपघातात मृत्यु



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी पंचायत सदस्य राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी बीड जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चुडामन आठवले यांचे तलवाडा कडुन गेवराई कडे जात आसतांना समोर येणा–या पिकअप क्रमांक एम एच १४ – ४९९७ या वाहनाने जोराची धडक दिल्याने जागीच मृत्यु झाला. त्यांना तात्काळ गेवराई ऊप जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आल्याचे समजल्यावर तलवाडा करांनी रुग्णालयात एकच गर्दी केली. आज सकाळी १०. वाजता पी. एम नंतर शव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येऊल आसे समजते. अंतविधी आज. १. वाजता तलवाडा येथे करण्यात येईल दैनिक मराठवाडा पत्र परिवार आठवले कुटुंबीयाच्या दु:खात सहभागी आहे.

### आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या कुसुमबाई सिरसट यांचे निधन



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील रहिवासी तथा आंबेडकरी चळवळीतील निष्ठावान कार्यकर्त्या कुसुमबाई बाबुराव सिरसट यांचे शुक्रवार दि. ०१ मे २०२६ रोजी मध्यरात्री ११:४५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. शनिवार, दि. ०२ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास स्थानिक स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने पिंपळनेर गावावर शोककळा पसरली असून प्रत्येकाच्या मनात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कुसुमबाई सिरसाट यांचा स्वभाव अतिशय साधा, प्रेमळ आणि मनमिळाऊ होता. प्रत्येकाला आपलेसे करण्याची त्यांची ताकदच त्यांची खरी ओळख होती. पिंपळनेर आणि परिसरात त्यांना 'काकू' या नावाने ओळखले जात होते. विचारांची आणि माणुसकीची ओळख असणाऱ्या कुसुमबाई सिरसट या केवळ एक व्यक्ती नव्हत्या, तर त्या विचारांचा प्रवाह होत्या. त्यांच्यावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यांनी आयुष्यभर समाजातील वंचित, पीडित घटकांसाठी कार्य करत आंबेडकरी चळवळीला बळ दिले. शनिवार, दि. ०२ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास स्थानिक स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

### भालचंद्र विद्यालयाची निकालाची परंपरा कायम; बारावी परीक्षेत ९४.१५ टक्के यश



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

भालचंद्र विद्यालयाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत एकूण ९४.१५ टक्के निकाल नोंदविला आहे. विज्ञान शाखेत ९७.७० टक्के तर कला शाखेत ९०.४७ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेसाठी एकूण ८७ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी ८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २ विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरले. विद्यालयातून विज्ञान शाखेत गुणानुक्रमे संकेत प्रताप जोगदंड (७५.५० टक्के), चैतन्य अंकुश घोलप (७५.०० टक्के), सिद्धी नितीन संचेती (६८.३३ टक्के), राधिका संतराम ढास (६७.१७ टक्के), चैतन्य अप्पाराव मुळे (६५.३३ टक्के) व सार्थक कुमार पवार (६५.३३ टक्के) यांनी यश संपादन केले. विज्ञान शाखेत २ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. कला शाखेत ८४ विद्यार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी ७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गुणानुक्रमे हरिओम शहाजी घोडके (७५.१७ टक्के), रोहन सुखदेव भोसले (७३.५० टक्के), रत्नाकर सतीश मोरे (७३.०० टक्के), संदीप राजेश वाडमारे (७०.५० टक्के) व अदिती पांडुरंग माने (६९.५० टक्के) यांनी आघाडी घेतली. कला शाखेत १ विद्यार्थ्याने विशेष प्राविण्य मिळविले असून २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ५ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव दीपक (दादा) घुमरे, अध्यक्ष यू.बी. सुकाळे (अप्पा), उपाध्यक्ष कल्याण (बापू) वाणी, संचालक नामदेव (नाना) जाधव, रमेशचंद्र पाटील, दिलीप बारगजे, प्राचार्य सावंत के. बी., पर्यवेक्षक हवळे ए. एम. तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# देशाच्या विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान : श्रीमती सुदामतीताई वाघ

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासात महाराष्ट्राने नेहमीच हिरीरीने सहभाग घेत मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा हाच प्रेरणादायी इतिहास आदर्श माणुन विद्यार्थ्यांनी नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करावीत असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणा नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव आदरणीय नामदेवराव वाघ, गावातील प्रतिष्ठित नागरिक दिलीपराव जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण, आत्माराम वाव्हळ, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते. बीड शहरा पासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात १ मे 'महाराष्ट्र दिन' अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा



श्रीमती सुदामतीताई वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर काही निवडक विद्यार्थी आणि शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. त्या नंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा जागर केला. यावेळी पुढे बोलताना श्रीमती

सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, देशात सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यात महाराष्ट्राचे योगदान अतुलनीय आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळताना देशाच्या विकासात महाराष्ट्राने नेहमीच हिरीरीने सहभाग घेतला आहे. महाराष्ट्राच्या या प्रेरणादायी इतिहासाला विद्यार्थ्यांनी आदर्श माणुन नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करावीत असे शेवटी विद्यार्थ्यांना आवाहन केले. अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांच्या भाषणानंतर इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवरांनी इयत्ता ८वी आणि ९ वी वर्गातील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्माराम वाव्हळ सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दत्तात्रय चव्हाण यांनी मानले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## उपमुख्यमंत्री मा.सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील जनगणना २०२७ च्या स्वगणनेचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते आज जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. त्यांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर स्वतः लॉगिन करून स्वतःची प्राथमिक माहिती भरत स्वगणनेचा शुभारंभ केला. १ मे ते १५ मे दरम्यान होणाऱ्या स्वगणना व घरगणनेच्या प्रक्रियेचा यावेळी



औपचारिक प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी मा.जितीन रहमान व पोलीस अधीक्षक मा. नवनीत कावत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मा.शिवकुमार स्वामी व उपजिल्हाधिकारी मा.शैलेश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा जनगणना कार्यालयाच्या वतीने उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे व जिल्हा समन्वयक आशिष शिंदे यांनी स्वगणनेची माहिती सांगितली. जनगणना ही देशाच्या नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, सर्व नागरिकांनी स्वगणनेत सहभागी होऊन अचूक माहिती देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री मा.सुनेत्राताई पवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लिंबागणेश येथील त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाची शांतीब्रम्ह तुकाराम महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिरात श्रीगुरू ईश्वरभारती महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित त्रिदिनी अखंड हरिनाम व भावार्थ रामायण कथा सप्ताहाची सांगता आज दि.०२ शनिवार रोजी श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने उत्साहात करण्यात आली.

दि.३० एप्रिल ते ०२ मे दरम्यान पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यात श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महादेव भारती महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोपाच्या दिवशी शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांच्या ओव्यांद्वारे प्रभावी व सुश्राव्य किर्तन सादर करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.

तुझिये संगती जाली आमुची निश्चिंती, नाही देखिले ते मळे, भोग सुखाचे सोहळे या अभंग ओव्यांचा दाखला देत भगवंताच्या सहवासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. संत साहित्याच्या माध्यमातून अध्यात्मिक उन्नतीचा संदेश देण्यात आला. सप्ताह काळात ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर व ह.भ.प. प्रेममुर्ती धर्मराज दादा सामनगावकर यांनीही सुश्राव्य किर्तन सेवा दिली. या त्रिदिनी सप्ताहात काकडा, भजन, शिवलीलामृत, पारायण, गाथा पारायण, भावार्थ रामायण, हरिपाठ, हरिकिर्तन व जागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोप प्रसंगी काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येऊन सप्ताहाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### के.एस.पी विद्यालय येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के. एस.पी विद्यालय येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नंतर ध्वजारोहण करण्यात आला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर,धार्मिक, गीतांवर नृत्य, नाटिका, भाषण सादर केले. सर्व उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या वेळी मागील शैक्षणिक वर्षाचा निकाल सादर करण्यात आला. सर्व विदयार्थ्यांनी घवघवीतय यश प्राप्त केले. त्याबद्दल शाळेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अंकुश राऊत तसेच संस्था मार्गदर्शक सौ.अंजलीताई शेळके , प्रमुख उपस्थिती ऋषिकेशजी शेळके जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.

## पर्यवेक्षकांनो सावधान! नीट परीक्षेच्या मानधनावर डल्ला मारण्यास मुख्याध्यापक तयार

### लेखी तक्रार देऊन कारवाई करण्यास प्रशासनाला भाग पाडा

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ३ मे २०२६ रविवार रोजी नीट परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या पर्यवेक्षकांच्या मानधनावर गेल्या काही वर्षांपासून शहरातील एका शाळेचे मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक संगणमत करून डल्ला मारू लागले आहे. यावेळीही डल्ला मारण्याची त्यांची पूर्ण तयारी आहे. तेव्हा पर्यवेक्षकांनी सजग राहून अशा मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापकांची लेखी तक्रार प्रशासनाकडे करून कडक कारवाई करण्यास भाग पाडावे असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसुफ़ यांनी केले आहे.

नीट परीक्षा घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी पर्यवेक्षकांना एक दिवसाचे मानधन म्हणून ३००० रुपये रोख आणि परीक्षा पूर्व एक दिवस अगोदर बैठकीसाठी जेवण




शासनाकडून दिले जाते मात्र या मानधनात व जेवणात गेल्या चार–पाच वर्षांपासून एका शाळेचे मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक मिळून संगनमताने पर्यवेक्षकांना मिळणाऱ्या तीन हजार रुपयांच्या रक्कम ऐवजी फक्त एक हजार रुपये आणि जेवणाऐवजी फक्त चहावर बोळवण करतात. यावेळी रविवारी होणाऱ्या नीट परीक्षेच्या निमित्ताने बीड शहरात असा घोटाळा पुन्हा होऊ नये अशी चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. यामुळे पुन्हा या परीक्षा स्थळी मानधन आणि जेवणाच्या रकमेत घोटाळा होऊ नये म्हणून पर्यवेक्षकांनी सावध राहावे तसेच अशाप्रकारे जर पुन्हा मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांनी मानधन आणि जेवणावर डल्ला मारला तर त्यांची रीतसर लेखी तक्रार प्रशासनाकडे करावी. तसेच तक्रारदार पर्यवेक्षकांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल अशा प्रकारे कारवाई करावी असे आवाहन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त ईट येथील गटाने बनविल्या नैसर्गिक निविष्टा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आयोजित विविध कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना भेटी देऊन माहिती घेण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमधील प्रकल्प उपसंचालक, आत्मा बीड श्री पाटील साहेब, उपकृषी अधिकारी श्री सुहास जोगदंड साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी श्री चैतन्य वाघमारे, जुबेर पठाण बीटीएम आत्मा यांनी इट येथील श्री रामप्रसाद डोईफोडे यांचे शेतावर भेट देऊन त्यांच्या कार्याविषयी माहिती घेतली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे साहेब, तालुका कृषी अधिकारी



बीड मा.अशोक साळी साहेब, मंडळ कृषी अधिकारी श्री तुकाराम सारुख साहेब मा,खमगाव घतघ चे प्रमुख डॉ हनुमान गरुड सर यांचे मार्गदर्शनाखाली रामप्रसाद डोईफोडे यांनी सेंद्रिय शेतीचे फार मोठे काम उभारले आहे. गांडूळ खत प्रकल्प, बायोगास प्रकल्प, गोधन, इत्यादी पाहणी केली व खरीप रब्बी उन्हाळी हंगामातील पीक उत्पादना विषयी माहिती घेऊन समाधान व्यक्त केले. याप्रसंगी गटातील शेतकरी , पांडुरंग डोईफोडे, एकनाथ डोईफोडे, महेश डोईफोडे, परमेश्वर डोईफोडे, उद्धव डोईफोडे, कामेश्वर नरनाळे, नितीन काकडे, ओम काकडे, एकनाथ डोईफोडे, सुभाष भोसले, हनुमान डोईफोडे समृद्धी महिला शेतकरी गटाचे अध्यक्ष मंगल रामप्रसाद डोईफोडे सर्व मान्यवरांच्या समोर दशपर्णी अर्क बनवण्यात आला त्याच्या निविष्ठा , लिंबाचा पाला , सीताफळीचा पाला करंजीचा पाला ,मोगल्याचा पाला, धोत्र्याचा पाला, रुटीचा पाला, गुळवेलीचा पाला , पपईचा पाला, घाणेरी चा पाला, बेशरमचा पाला, एरंडीचा पाला, पाच किलो शेण दहा लिटर गोमूत्र, दोन किलो हिरव्या मिरचीचा ठेचा , अर्धा किलो लसणाचा ठेचा व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत विभाग स्तरीय कार्यशाळा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाली त्यामध्ये गुजरातचे गोपाल भाई सुतारिया यांनी गोकृपा अमृत चे विर्जन दिले त्यापासून २०० लिटर गोकृपा अमृतम बनवले व शेवटी रामप्रसाद अशोक डोईफोडे यांनी सर्वांचे आभार मानले.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश**
**क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ११८/२०२६**
**विठ्ठल नारायण मिसाळ वि. निल**

अर्जदार :– **१. विठ्ठल पि. नारायण मिसाळ, वय ६४ वर्षे वर्षे, धंदा– शेती, रा. पाडळी ता.शिरुर का. ह. मु. बीड ता.जि.बीड. २. रामकृष्ण पि. नारायण मिसाळ, वय– ५९ वर्षे, धंदा– शेती रा. सदर, ३. सुनंदा भ्र. वसंतराव वाघ, वय– ६६ वर्षे धंदा– घरकाम, रा. कुरळा ता. मालेगाव जि.वाशिम, ४. द्वारकाबाई भ्र. लहु ढाकणे, वय ६२ वर्षे धंदा घरकाम, रा. सांगळवाडी ता. शिरुर कासार जि. बीड.**

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत

ज्यापोक्षा **मयत नामे हौसाबाई भ्र. नारायण मिसाळ यांचा मृत्यू दि. १७.१०.२०१७ रोजी मौजे पाडळी, ता. शिरुर कासार जि. बीड** येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्रमांक १व २ मयतान मुले आहेत अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या विवाहित मुली आहेत, यांच्याशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०.०४.२०२६ रोजी माइया सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १९.०६.२०२६ ही आहे.**

**(मार्फत ॲड. एस.खाडे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर का.**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक
# मराठवाडा पत्र
▸▸ रविवार, दि. ०३ मे २०२६



## क्रोध व अहंकार त्यागल्यासच आनंदी जीवन ह.भ.प.अशोक महाराज नांगरे



**कवडगाव (प्रतिनिधी)** : तालुक्यातील मोरेवाडी येथील नांगरे वस्तीमध्ये श्री नरसिंह जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण महाकथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या धार्मिक सोहळ्यात हभप अशोक महाराज नांगरे यांच्या ओजस्वी वाणीतून सुरू असलेल्या शिवपुराण कथेमुळे परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. कथेदरम्यान मार्गदर्शन करताना महाराजांनी ▶▶ उर्वरित पान २ वर



# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीसह 'तुलसी क्रिएशन' शोरूमचे आज उद्‌घाटन

### विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या वतीने विद्यार्थिनींच्या कौशल्याला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या 'तुलसी क्रिएशन - द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड' शोरूम तसेच महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी १०:३० वाजता संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय.टी.आय. मागे, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा सोहळा पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत संपन्न होणार असून, पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, पूज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याचे उद्घाटन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबईचे प्रधान सचिव मा.डॉ. हर्षदीप कांबळे आणि समाज कल्याण विभाग, पुणे यांच्या आयुक्त मा. दीपा मुधोळ-मुंडे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा. प्रदिप रोडे हे असणार आहेत.

याशिवाय, विविध क्षेत्रांतील प्रशासकीय अधिकारी, शिक्षण, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती लाभणार आहे. विद्यार्थिनींना केवळ शिक्षण न देता त्यांना उद्योजक बनवणे या ध्येयाने हे शोरूम सुरू करण्यात आले आहे. फॅशन डिझाईनच्या विद्यार्थिनींनी तयार केलेले कलात्मक पेहराव आता थेट ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहेत. महाविद्यालयाची नवीन इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज असून, यामुळे जिल्ह्यातील फॅशन शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे. या प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळ्यास सर्व क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थिनींच्या या नव्या प्रवासाला बळ द्यावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचेसह प्राध्यापक व कर्मचारीवृंद यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी लाभदायक : विजयसिंह पंडीत

### बीड येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे विविध मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक व नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, त्यांच्या शेतीत उत्पादन वाढावे आणि आर्थिक उन्नती साधता यावी या उद्देशाने महेश बेदरे यांनी सुरू केलेले कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे, असे प्रतिपादन गेवराई ची लोकप्रिय



आमदार विजयसिंह पंडित यांनी केले यांनी केले. ते बीड येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगर उपाध्यक्ष विनोद मुळक , सभापती निजामभाई , शिवसेनेचे गणेश उगले , स्वागत अध्यक्ष दिलीपराव गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके, कैलास रकटे , बंडू जटाळ , युवा नेते राजेंद्र मोटे, गणेश राऊत , मुख्य संयोजक महेश बेदरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार म्हणाले की, आज अनेक परदेशांमध्ये शेती तंत्रज्ञान प्रचंड वेगाने विकसित झाले असून आधुनिक यंत्रणा, डिजिटल प्रणाली व संशोधनाच्या आधारे त्यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा हटविल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्रदिनी लिंबागणेश येथे निदर्शने : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

एनसीईआरटीच्या इयत्ता आठवीच्या इतिहास पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा हटविण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाच्या निषेधार्थ आज दि.१ मे महाराष्ट्रदिनी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत आंदोलन



करण्यात आले. यावेळी मराठा साम्राज्याचा इतिहास हा केवळ अभ्यासाचा विषय नसून तो स्वाभिमान आणि पराक्रमाचे प्रतीक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना मराठ्यांच्या साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा अभ्यासक्रमातून हटविणे म्हणजे मराठ्यांचा गौरवशाली इतिहास पुसण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप यावेळी करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

# भोगलगाव कार्नर ते गंगावाडी रस्ता कामात दोन्ही बाजुने ड्रेन न काढताच धिम्या गतीने काम सुरु

### गंगावाडी कार्नर रस्त्यात नळ्या न टाकल्यास पाणी रोडवर पसरून रस्ता खचन्याची शक्यता



**तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भोगलगाव गंगावाडी कार्नर पर्यंतचा रस्ता गेल्या दोन आडीच वर्षापासुन नुसताच खादुन ठेवल्या मुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगणे, बाळू डहाळे, सुनिता भाभी गिल व गावक-यांच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिनी सकाळी १०. वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको आंदोलन देखील करण्यात आले. या वेळी संबंधित अभियंता व गुत्तेदारा प्रती उपस्थितातुन मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करण्यात आला. संबंधित अभियंता व गुत्तेदाराने कामाला उशीर झाल्यामुळे आंदोलकांशी विनंती करत आठ दिवसाचा वेळ मागत रखडलेले काम आठ दिवसात सुरु करण्यात येईल आसे लेखी दिले. यावेळी तलवाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी श्री कैलास आन्नलदास, बीट अमलदार पांडुरंग देवकते, पवन शेळके, दुर्गा दळवी, विठ्ठल राठोड यांनी मोलाचे सहकार्य केले.**

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भोगलगाव गंगावाडी कार्नर पर्यंतचा सिमेंट व डांबरी रस्ता मंजुर होऊन जवळपास दोन अडीच वर्षाचा कालावधी उलटुन गेलेला आसतांना संबंधित अभियंता व गुत्तेदाराच्या हलगर्जीपणामुळे ह्या रस्त्याचे काम कासवगतीने सुरु आसल्याने नागरिकातुन संताप व्यक्त केला जात असुन खोदकाम करुन ठेवलेल्या ठिकाणी आणेक दुचाकी स्वार पडुन मोठ्या प्रमाणात दुखापती झाल्याचा प्रकार आणेक वेळा या रस्त्यावर घडुन देखील संबंधित अभियंता व गुत्तेदार कामाची गती वाढवण्यास आणुकुलता दाखवत नसल्याने १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी १०, वाजता मोठ्या प्रमाणात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. याच रस्त्याला आणुसरुन भोगलगाव कार्नर ते गंगावाडी कार्नर रस्ता कामात दोन्ही बाजुने ड्रेन न काढल्याने उजव्या बाजुचे पाणी डाव्या बाजूस ऊलथुन शेतकऱ्यांच्या शेती व पिकांची मोठ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# आमदार नमितातार्ई मुंदडा यांच्या हस्ते अंबाजोगाई येथे सह दुय्यम निबंधक वर्ग २ कार्यालयाचे लोकार्पण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून आज केज मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार नमिताताई मुंदडा यांच्या शुभहस्ते सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालयाचा भव्य लोकार्पण सोहळा संपन्न झाला. या नवीन कार्यालयामुळे अंबाजोगाई परिसरातील नागरिकांची दस्त



नोंदणी व इतर प्रशासकीय कामांसाठी होणारी गैरसोय आता दूर होणार आहे.या सोहळ्याप्रसंगी मंचावर उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वामी साहेब यांच्यासह महसूल आणि बांधकाम विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. नागरिकांची

# देवीनिमगाव येथे मंगळवारी महापुरुषांच्या संयुक्त जयंतीचा जागर; शीतल साठे, सचिन माळी यांच्या शाहिरी जलशाचे विशेष आकर्षण

**● रिपाइं (आठवले गट) शाखेचा पुढाकार ; माजी आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) शाखेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी संयुक्त जयंती महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तथागत गौतम बुद्ध,महात्मा ज्योतिबा फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मंगळवार दि.५ मे २०२६ रोजी



गावात विविध प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल ▶▶ उर्वरित पान २ वर

# आठ दिवसांत नागझरी- मानेचावाडा रस्त्याचे काम सुरु होईल : आ. संदीप क्षीरसागर



### महंत शिवाजी महाराजांच्या हस्ते रस्ता कामाचा नारळ फोडून शुभारंभ !

**बीड । प्रतिनिधी**

नागझरी-मानेचावाडा येथील दीड किलोमीटर लांबीचा अत्यंत खराब व अरुंद रस्ता लवकरच रुंद व पक्का रस्ता करून देत असल्याची आनंददायी घोषणा आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. श्री क्षेत्र नारायण गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत, आठ दिवसांत पक्का रस्ता कामाचा शुभारंभ करू, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले. श्री क्षेत्र नारायण गडाच्या मानेचावाडा-नागझरी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी महंत शिवाजी महाराज, आ. संदीप क्षीरसागर आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के हे एकत्र आले होते. यावेळी महंत शिवाजी महाराजांनी ग्रामस्थांच्या रस्ता गैरसोयीची जाणीव करून देत, या रस्त्याची तातडीने सुधारणा व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. महाराजांच्या या शब्दाला तात्काळ प्रतिसाद देत आ. क्षीरसागर यांनी आठ दिवसात पक्का रस्ता कामाची सुरुवात होईल. रस्ता रुंद व सुव्यवस्थित करून दिला जाईल.अशी घोषणा केली. आणि महाराजांच्या हस्ते रस्ता कामाचा नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. उल्लेखनीय म्हणजे, मागील अतिवृष्टीमुळे हा रस्ता अत्यंत खराब झाला होता. यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येच्या निराकरणा साठी ग्रामस्थांनी ▶▶ उर्वरित पान २ वर